( महाराष्ट्र पोलीस राजपत्र, विभागीय भाग ६ अ करिता )

क्र: पोमसं /८अ/नि.सू -२०१६-१७(वश्रेलि ते प्र.लि.)/मफुसल/२३६/२०१६ मुंबई , दिनांक : 25 /०५/२०१७

## -: आदेश :-

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मुफसल लिपीक संवर्गातील खालील नमूद वरिष्ठ श्रेणी लिपीक यांना (अराजपत्रित गट क ) प्रमुख लिपीक (अराजपत्रित गट क ) या पदावर कार्यभार स्विकारल्याच्या दिनांकापासून पदोन्नती देण्यात येत असून पदोन्नतीवर त्यांची नियुक्ती त्यांच्या नावांसमोर दर्शविलेल्या कार्यालयामध्ये करण्यात येत आहे :-

| अ.क्र. | वरिष्ठ श्रेणी लिपीकांचे नाव | सध्याच्या नियुक्तीचे कार्यालय | पदोन्नतीवरील नवीन नेमणूकीचे कार्यालय |
|---|---|---|---|
| १ | श्री अशोक अंबादासजी पराते | विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती | समादेशक, रारापोबल, गट क्र ९, अमरावती |
| २ | श्री सतिश माधवराव सातपुते | पोलीस अधीक्षक, अे.सी.बी., नाशिक | समादेशक, रारापोबल, गट क्र ६, धुळे |
| ६ | श्री नरेंद्र गणपतराव गावंडे | उप आयुक्त, रागुवि, ओरंगाबाद | समादेशक, रारापोबल, गट क्र ३ जालना |
| ४ | श्री महेश बबन धटिंगण | विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र, नाशिक | समादेशक, रारापोबल, गट क्र ३ जालना |
| ५ | श्री प्रविण रमेश गायकवाड | अपर पोलीस महासंचालक, गुअवि, म.रा., पुणे | समादेशक, रारापोबल, गट क्र ५, दौंड |
| ६ | श्री अशोक श्रीहरी मडावी | पोलीस अधीक्षक, विकृद, नागपूर | पोलीस अधीक्षक, अे.सी.बी., नागपूर |
| ७ | श्री संजय सोनू शिगवण | अपर पोलीस महासंचालक, गुअवि, म.रा., पुणे | समादेशक, रारापोबल, गट क्र १०, सोलापूर |
| ८ | श्री बाळू गोविंद मोरे | अपर पोलीस महासंचालक, गुअवि, म.रा., पुणे | समादेशक, रारापोबल, गट क्र १२, हिंगोली |
| ९ | श्री तान्हाजी गजानन तापकीर | अपर पोलीस महासंचालक, गुअवि, म.रा., पुणे | समादेशक, रारापोबल, गट क्र ५, दौंड |

**प्रज्ञा सरवदे**
अपर पोलीस महासंचालक (प्रशासन)
महाराष्ट्र राज्य, मुंबई .

प्रति,

अपर पोलीस महासंचालक, गुन्हा अन्वेषण विभाग, म.रा., पुणे
विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र / अमरावती परिक्षेत्र
पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक / नागपूर
पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, नागपूर
उप आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, ओरंगाबाद
समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र ३, जालना / गट क्र ५, दौंड / गट क्र.६, धुळे /
गट क्र. ९, अमरावती / गट क्र. १०, सोलापूर /गट क्र. १२, हिंगोली.

२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. वशिअ-१२१४/प्र.क्र.२६/११, दिनांक ०२/०६/२०१४ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार वर नमूद वरिष्ठ श्रेणी लिपीकांकडून सन २०१५-१६ च्या वित्तीय वर्षाचे ३/२०१६ अखेर पर्यंतचे मत्ता व दायित्वाचे विवरणपत्र संबंधित घटक प्रमुखांनी प्राप्त करुन, तसा दाखल या कार्यालयास सादर करुन मगच संबंधितांना पदोन्नतीवर कार्यमुक्त करावे.

३. उपरोक्त वरिष्ठ श्रेणी लिपीक यांना आता निलंबित केले असेल, किंवा त्यांच्याविरुध्द नव्याने विभागीय चौकशी प्रलंबित असेल, किंवा न्यायालयात खटला चालू असेल, किंवा न्यायालयाने दिलेल्या निर्णयांविरुध्द वरिष्ठ न्यायालयात अपिल प्रलंबित असेल, किंवा जर ते एखादी शिक्षा भोगत असतील तर घटक प्रमुखांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांना पदोन्नतीवर न सोडता सविस्तर अहवाल पोलीस महासंचालक कार्यालयास पाठवावा व पुढील आदेशांची वाट पाहावी.

४. उपरोक्त वरिष्ठ श्रेणी लिपीकांविरुध्द वरीलप्रमाणे काहीच कार्यवाही प्रलंबित नसेल तर त्यांना **पर्यायी वरिष्ठ श्रेणी लिपीकाची वाट न पाहता** पदोन्नतीवर नवीन नियुक्तीचे ठिकाणी तात्काळ कार्यमुक्त करावे. तसेच त्यांना कार्यमुक्त केल्याचा व पदोन्नतीच्या ठिकाणी हजर झाल्याचा दिनांक सत्वर ह्या कार्यालयास कळवावा.

५. घटक प्रमुखांनी संबंधित वरिष्ठ श्रेणी लिपीकांना विनाविलंब कार्यमुक्त न केल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी संबंधित घटक प्रमुखांची राहील.

६. शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक पीअेच्वाय् /१०८२/सीआर्/११००(२)/अेस्ईआर् -३, दिनांक ०६.११.१९८४ अन्वये पदोन्नतीनंतर कनिष्ठ पदावर वेतनवाढ दिल्यानंतर वेतननिश्चिती करण्याबाबत विकल्प द्यावयाचा असेल, तर तो पदोन्नतीवर हजर झालेल्या दिनांकापासून १ महिन्याचे आंत द्यावा. अशा प्रकारचा विकल्प न दिल्यास पदोन्नत पदावरील वेतननिश्चिती म.ना.सेवा (वेतन) नियम, ११(१)(अ) अन्वये केली जाईल याची उपरोक्त वरिष्ठ श्रेणी लिपीकांनी नोंद घ्यावी.

७. सदरहू आदेश मा.उच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या मूळ याचिका क्रमांक क्रमांक २७९७/२०१५ वरील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून निर्गमित करण्यात येत आहेत.

८. उपरोक्त वरिष्ठ श्रेणी लिपीक हे पदोन्नतीवर जाण्यास इच्छुक नसतील तर त्यांनी तसा **अर्ज ७ दिवसांचे आत (दिनांक ३०/०५/२०१७ पर्यत )** घटक प्रमुखांचे मार्फत ह्या कार्यालयास सादर करावा. तसा अर्ज त्यांनी सादर न केल्यास घटक प्रमुखांनी त्यांना दिनांक ३१/०५/२०१७ रोजी न चुकता कार्यमुक्त करावे व अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

९. पदोन्नती आदेशानंतर जे वरिष्ठ श्रेणी लिपीक रुग्ण निवेदन करतील अथवा गैरहजर राहतील त्यांना रुग्ण निवेदनाच्या तारखेपासून स्थित कार्यमुक्त (Stand relieved) करण्यात यावे, व त्यांना कार्यमुक्त केल्याचा आदेश त्यांच्या निवासस्थानी बजावावा.

प्रत,

अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, म.रा., मुंबई .
अपर पोलीस महासंचालक, विशेष कृती दल, म.रा., मुंबई .
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे. / नागपूर
कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक १० / १२
पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष.

२. सदरचे आदेश कृपया पोलीस महासंचालकांच्या संकेतस्थळावर एक महिन्यासाठी उपलब्ध करुन देण्यात यावेत.

प्रत सविनय सादर,

महासंचालक, अॅन्टी करप्शन ब्युरो, महाराष्ट्र राज्य, मुंबई

(अनुप कुमार सिंह )
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन)
पोलीस महासंचालक यांचेकरीता.